दैनिक

# महा मेट्रो

www.mahametronews.in

वर्ष ४ थे : अंक : १० पुणे, शुक्रवार, २९ ऑगस्ट २०२५

पाने : ४ किंमत : ३.००

RNI NO.MAHMAR2022/87390

VOL NO.04. ISSUE : 10 Pune, Friday, 29 August 2025

Pages : 4 PRICE : 3.00


## महत्वाचे...

### नोकरीच्या आमिषाने १७ लाखांची फसवणूक

**पुणे । प्रतिनिधी**

हिंजवडी परिसरात बनावट कंपनी उभारून तरुणांना मोठ्या पगाराची नोकरी देण्याचे आमिष दाखवून तब्बल १७ लाख १६ हजार ५०० रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी हिंजवडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फ्लायनट सास प्रा. लि. या नावाने हिंजवडी फेज २ येथील इम्पेरीअर राईज सोसायटीमध्ये कार्यालय सुरू करून आरोपींनी अनेक तरुणांना नोकरीचे आमिष दाखवले. मोठा वार्षिक पगार मिळेल असे सांगून तरुणांकडून १ लाख ते २.५ लाख रुपये कंपनीच्या बँक खात्यात जमा करून घेण्यात आले. यानंतर मेलद्वारे नियुक्तीपत्र, ऑफर लेटर, पॅकेजविषयी माहिती देण्यात आली. तसेच गुगल मिटवर ऑनलाइन प्रशिक्षणही घेण्यात आले. सुरुवातीला काहींना थोडाफार पगार देऊन विश्वास बसवला; पण त्यानंतर ७-८ महिने काम करून घेतले तरी पगार न देता ''परिक्षेत नापास'' किंवा ''इंटरव्ह्यू अपयशी'' अशी कारणे देऊन सर्वांना थेट फसवण्यात आले. या प्रकारात अनेक मुलांकडून मिळून तब्बल १७.१६ लाख रुपयांचा अपहार झाल्याचे स्पष्ट झाले आहे. आरोपी उपेश पाटीलला अटक करण्यात आली आहे.

### निघोजे गावात गुटख्याचा साठा जप्त

**चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महाळुंगे एमआयडीसी पोलिसांनी निघोजे मोई रोडवरील एका भाड्याच्या खोलीवर धाड टाकून गुटख्याचा मोठा साठा हाती घेतला. शनिवारी (२३ ऑगस्ट) रात्री ७ वाजता ही कारवाई करण्यात आली. राजस्थानमधील मूळचा टोयाराम बोराराम चौधरी नावाचा व्यक्ती निघोजेत राहत असून, त्याच्या खोलीत तब्बल १५,४०० रुपयांचा १५४ पाकिटांचा गुटखा साठवून ठेवलेला आढळला. हा गुटखा विक्रीसाठी ठेवण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणात महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### पिस्तूलसकट युवक पोलिसांच्या जाळ्यात

**पुणे । प्रतिनिधी**

बावधन - ओंकार गार्डन ब्रिज ते चांदणी चौक रस्त्यावर शुक्रवारी रात्री नऊच्या सुमारास पोलिसांना धक्कादायक माहिती मिळाली. एम-कनेक्ट बिल्डिंग शेजारी एक तरुण देशी बनावटीचे पिस्तूल आणि जिवंत राऊंडसकट थांबलेला आढळला. राहुल उर्फ सोन्या प्रकाश ढगे (वय २५, रा. पारखे वस्ती, सुसगाव, ता. मुळशी) असे त्या तरुणाचे नाव असून पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून ५० हजार रुपये किमतीचे पिस्तूल आणि १ हजार रुपये किमतीचे एक जिवंत राऊंड जप्त करण्यात आले. या परिसरात आधीच पोलीस आयुक्तांनी शस्त्रबंदी आदेश जारी केला होता. तरीही ढगे हा पिस्तूलसकट फिरताना सापडल्याने त्याच्यावर कारवाई करण्यात आली.



## ३५ हजार महिलांचा सामूहिक स्वर: दगडूशेठ गणपतीसमोर ऋषीपंचमीला अथर्वशीर्ष पठण

गणेशोत्सवाच्या उत्सवी वातावरणात ऋषीपंचमी निमित्त पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर परिसर आज हजारो महिलांच्या गजराने दुमदुमून गेला. तब्बल ३५ हजार महिलांनी एकत्र येऊन अथर्वशीर्ष पठण करत गणरायाला वंदन केले. पहाटेपासूनच महिलांनी उत्साहाने कार्यक्रमस्थळी गर्दी केली होती. सकाळच्या हलक्या पावसातही भक्तीभावाने सहभागी झालेल्या महिलांच्या उपस्थितीमुळे मंदिर परिसर ऊर्जा आणि भक्तीने भारला गेला होता. कार्यक्रमाला खासदार सुनेत्रा पवार उपस्थित राहून त्यांनी महिलांना शुभेच्छा दिल्या. 'ओम गं गणपतये नमः' या जयघोषात अथर्वशीर्ष पठणाचा सुरेल स्वर गुंजत होता. पठणानंतर महाआरती व गजर करीत स्त्रीशक्तीचा जागर झाला. महिलांनी सांगितले की, वर्षातून एकदा केलेले अथर्वशीर्ष पठण वर्षभर उर्जेचे स्रोत ठरते. या सोहळ्याचे आयोजन श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट आणि सुवर्णयुग तरुण मंडळ यांच्या वतीने करण्यात आले होते. ट्रस्टच्या १३३ व्या वर्षीच्या गणेशोत्सवात हा सोहळा विशेष आकर्षण ठरला. शंखनादाने प्रारंभ झालेल्या या सोहळ्यात 'ओंकार' जपाने वातावरण शांत व पवित्र झाले, तर अथर्वशीर्ष पठणाच्या तालबद्ध स्वरांनी मंदिर परिसर भक्तिमय झाला. दरवर्षी ऋषीपंचमीला आयोजित होणारे हे सामूहिक पठण पुण्यातील गणेशोत्सवाची परंपरा अधिक भव्य करत आहे.

# चार हजार क्षमतेचे कच्च्या कैद्यांसाठी दोन नवीन कारागृहांचा प्रस्ताव लालफितीत !

## येरवडा मध्यवर्ती कारागृहात पक्के कैदी; फौजदारी न्यायालयाचे काम सुरू

**पुणे । प्रतिनिधी**

येरवडा मध्यवर्ती कारागृहात तीस बराकींमध्ये २३२३ कैदी क्षमता आहे. मात्र याठिकाणी तब्बल साडे सहा हजार कैदी दाटीवाटीने राहत आहेत. त्यामुळे खुल्या कारागृहाच्या शेजारील तीस एकरात चार हजार कैदी क्षमता असलेले दोन कारागृह बांधण्याचा प्रस्ताव कारागृह प्रशासनाने राज्य सरकारला दिले आहे. ही दोनही आठ हजार कैदी क्षमतची कारागृह केवळ कच्च्या कैद्यांसाठी बांधले जाणार आहेत. महाराष्ट्र पोलीस गृहनिर्माण महामंडळ या दोन कारागृहांचे बांधकाम करणार आहे. तसा प्रस्ताव राज्य सरकारकडे दोन वर्षांपूर्वीच होते. मात्र ते लालफितीत आहे. तर जेल रस्त्यावर फौजदारी न्यायालयाचे काम सुद्धा सुरू झाले आहे.

येरवडा मध्यवर्ती कारागृहाचे एकूण कैदी क्षमता २३२३ आहे. मात्र कारागृहात सध्या साडेसहा हजार कैद्यांचे वास्तव आहे. कारागृहातील सर्कल एक, तीन आणि टिळक यार्डात प्रत्येकी आठ बराक, सर्कल दोन मध्ये सहा बराक तर किशोर विभागात तीन बराक आहेत. यासह अंडासेल,

### नवीन कारागृह आठ हजार कैदी क्षमतेचे

- येरवडा मध्यवर्ती कारागृह – ६५ एकरात ( २३२३ बंदी क्षमता)
- नवीन कारागृह– ३० एकर : तळ आणि पहिला मजला( ४००० बंदी क्षमतेचे दोन कारागृह)
- सराईत गुन्हेगारांसाठी– अतिसुरक्षित ३० खोल्या
- बाहेरी सिमाभिंत २१ फूटी तर आतील सिमाभिंत दहा फूटी

फाशीची शिक्षा सुनावलेले कैदी, रुग्ण कैदी, ज्येष्ठ नागरिक कैदी, विदेशी कैदी अशांना दाटीवाटीने विविध बाराकींमध्ये ठेवले आहे. यातील जवळपास सत्तर टक्के कच्चे कैदी आहेत. त्यामुळे तीन वर्षांपूर्वी कच्च्या कैद्यांची संख्या विचारात घेता त्यांच्यासाठी स्वतंत्र कारागृहाचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाने कारागृह प्रशासनाच्या संमतीने राज्य सरकारकडे पाठविले होते. आता मात्र, कैद्यांची पुढील

### चौकट हेडिंग.....

**येरवड्यात जिल्हा फौजदारी न्यायालयाचे काम सुरू विमानतळ रस्त्यावरील स.न.१९१, बंगला क्रमांक चार येथील आठ हजार चौरस मीटरमध्ये जिल्हा फौजदारी न्यायालयाची बहुमजली इमारत होत आहे. यामध्ये दोन तळमजली वाहनतळ असून आठ मजली इमारतीत चौवीस न्यायालय असणार आहेत. प्रमुख जिल्हा न्यायाधिशांच्या मार्फत १८० कोटी रूपयांच्या निधीचा प्रस्ताव राज्य सरकारला पाठविला होता. निधी मंजूर झाल्यामुळे फौजदारी न्यायालयाचे काम सुरू झाले आहे.**

काही वर्षांतील संख्या विचारात घेता चार हजार क्षमतेचे प्रत्येकी दोन कारागृहांची आवश्यकता आहे. यासाठी येरवडा खुल्या कारागृहाची काही एकर जागा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे कारागृहाच्या प्रशासनाच्या सोईनुसार येरवडा मध्यवर्ती कारागृहाच्या शेजारीच ही दोन प्रशस्त कारागृह बांधण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. मात्र ते लालफितीत अडकल्यामुळे नवीन कारागृहाला दिरंगाई होऊ शकते. येरवडा मध्यवर्ती कारागृहात केवळ शिक्षा झालेले पक्के कैदी ठेवले जाणार आहे.

नवीन कारागृहाची इमारत तळ आणि पहिला मजला असणार आहे. समोरच्या बाजुला प्रशासकीय इमारत, वरिष्ठ तुरूंगाधिकारी, तुरूंग अधिकारी यांचे कार्यालय असणार आहे. मध्यवर्ती भागात सेंट्रल किचन, गिरणी, किचन शेजारी दोन बराक, धान्य **पान ३ वर...**

# उदंड झाले फ्लेक्स! चौका चौकात फ्लेक्ससाठी लोखंडी पाईपचे सांगाडे

## शहर विद्रुपीकरण प्रतिबंधक कायदा कागदावरच; सर्वच राजकीय पक्षांकडून उल्लंघन

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या हद्दीत अनधिकृत फ्लेक्सबाजी जोरात आहे. शहर विद्रुपीकरण प्रतिबंधक कायद्यांतर्गत फ्लेक्सबाजी करता येत नाही. उच्च न्यायालयाने संबंधितांवर कायदेशीर कारवाई करा, दंडाची शिक्षा द्या, असे आदेश सर्व महापालिकांना दिले आहेत. मात्र, शहरातील आमदार, माजी नगरसेवकांपासून ते गल्लीतील कार्यकर्त्यांपर्यंत फ्लेक्सबाजी करण्याची स्पर्धाच लागली आहे. आता तर सर्वच राजकीय पक्षांनी फ्लेक्स लावण्यासाठी कायमस्वरूपी जागा आरक्षित करण्यासाठी

### प्रति चौरस फूट २२२ रुपये!

**जाहिरातीचे फ्लेक्स हे पदपथ, रस्ता, पथदिव्यांच्या खांबांवर, शाळेच्या सिमाभिंती अशा सार्वजनिक व महापालिकेच्या मालकीच्या जागेवर लावता येत नाहीत. मात्र, अनेकजण पदपथावर फ्लेक्सबाजी करतात. नियमाप्रमाणे प्रति चौरस फुटाला २२२ रुपये दर महापालिका आकाशचिन्ह विभागाने ठरवून दिलेला आहे. त्यामुळे सहाशे चौरस फुटाला नऊ ते दहा हजार रुपये शुल्क संबंधितांना भरावे लागते. मात्र, हे शुल्क न भरता सर्व राजकीय पक्ष नियमांची पायमल्ली करून महापालिकेचे कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडवत असल्याचे दिसून येते. त्यांच्यावर कारवाई कोण करणार, हा मुख्य प्रश्न आहे.**

लोखंडी पाईपचे सांगाडे चौका चौकात लावले आहेत. महापालिका आकाशचिन्ह विभाग मात्र राजकीय पक्षांवर कारवाई करताना दिसत नाही.

महापालिकेच्या पंधरा क्षेत्रीय कार्यालयांतील आकाशचिन्ह आणि अतिक्रमण विभाग निष्क्रीय झाले आहे. शहर असो की उपनगरांतील

### उच्च न्यायालयाकडून आयुक्तांची नेमणूक

**काही वर्षांपूर्वी उच्च न्यायालयाने महापालिका स्तरावर अशा फ्लेक्सवर देखरेख व संबंधितांवर कारवाई करण्यासाठी आयुक्तांची नेमणूक केली होती. संबंधित आयुक्तांनी महापालिका व क्षेत्रीय स्तरावर बैठका सुद्धा घेतल्या. त्यानंतर अनेक ठिकाणी अनधिकृत बॅनर व फ्लेक्सवर कारवाई सुद्धा करण्यात आली. त्यानंतर मात्र, पुन्हा 'जैसे थे' परिस्थिती झाली आहे.**

महत्त्वाच्या चौकात, रस्त्यावर, पथदिव्यांच्या खांबांवर, वाहतूक नियंत्रण दिव्यांच्या खांबांवर सर्रास फ्लेक्स लागलेले दिसतात. वर्षभर या ना त्या उत्सवाचे नागरिकांना शुभेच्छा देण्याचे फ्लेक्स दिसतात. वर्षांतील ३६५ दिवस पुढाऱ्यांपासून ते गल्लीतील कार्यकर्त्यांच्या वाढदिवसापर्यंत हे फ्लेक्स लागलेले असतात. आकाशचिन्ह विभाग व अतिक्रमण विभाग अलिखित नियमाप्रमाणे संबंधितांना वाढदिवस किंवा कार्यक्रम झाल्यानंतर हे फ्लेक्स उतरवतात. नाही तर फ्लेक्स तयार करणारेच हे फ्लेक्स काढून दुसऱ्या व्यक्तीचा फ्लेक्स त्याठिकाणी लावतात. आता तर शहरासह उपनगरातील चौका चौकात फ्लेक्ससाठी लोखंडी पाईपचे सांगाडे लावून जागा आरक्षित केले आहेत.

राजकीय नेते मंडळींमध्ये फ्लेक्स व होर्डिंगबाजी करण्याची स्पर्धा असते. त्याचा परिणाम शहर अधिकच विद्रुप होते. ही मंडळी बस स्थानक, शाळेच्या सिमाभिंती, पूल अशा सार्वजनिक ठिकाणी फ्लेक्सबाजी करतात. त्यांच्यावर कोणाचे नियंत्रण नाही. क्षेत्रीय कार्यालयातील आकाश चिन्ह विभाग व अतिक्रमण विभागाचे निरीक्षकांना दमबाजी करून नेते मंडळी फ्लेक्स सर्वत्र लावत आहेत.

### थोर समाजसुधारक श्री चक्रधरस्वामी यांच्या जयंती निमित्त अभिवादन...

**चिंचवड । प्रतिनिधी**

थोर समाजसुधारक श्री चक्रधरस्वामी यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे अभिवादन करण्यात आले. महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील श्री चक्रधरस्वामी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी मुख्य उद्यान अधिक्षक महेश गारगोटे, उप आयुक्त सीताराम बहुरे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच महानगरपालिकेच्या विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

संपादकीय....




## महिला व मुलींसाठी वस्त्यांमधील चौक व कट्टे असुरक्षित

शहरातील सर्वच वस्त्यांमधील चौक, कट्टे एवढेच नव्हे तर अंतर्गत रस्ते देखील महिला व मुलींसाठी धोकादायक बनले आहेत. या ठिकाणी महिलांची व मुलींची छेडछाड व अश्लील शेरेबाजी होते. या बाबत घरी सांगितले तर शाळा, कॉलेज व क्लासला जाणे बंद होते. उलट मुलीचीच चूक असल्याचा ठपका पालक ठेवतात. अशा मुलींचे पालक त्यांचा लवकर विवाह लावण्याच्या तयारीत असतात. त्यामुळे इकडे आड तिकडे विहिर अशी परिस्थिती वस्त्यांमधील मुली अनुभवत आहे. पुणे शहरात साधारणतः साडे पाचशे वस्त्या आहेत. या वस्त्यांमध्ये कमी अधिक प्रमाणात महिला व मुलींच्या छेडछाडीच्या घटना घडत असतात. यातील हाताच्या बोटावर मोजण्या इतक्या छेडछाडीच्या घटनांची नोंद पोलीस ठाण्यात होते. अनेक घटनांकडे पीडीत मुली, महिला व पालक दुर्लक्ष करीत असल्यामुळे याची नोंदच कुठे होत नाही. या संदर्भात पुणे शहरातील वस्त्यांमध्ये काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था व संस्थेअंतर्गत सहभागी झालेल्या महिला व मुलींशी सीविक मिररच्या प्रतिनिधीने संवाद साधला तेव्हा वस्त्यांधील भयाण वास्तव समोर आले. ग्रीनतारा संस्थेच्या डॉ. मंदा मुने म्हणाल्या , यशवंतनगर, राजीव गांधीनगर, भीमनगर, एकतानगर येथील वस्त्यांधील पौगंडावस्थेतील मुलींसोबत काम करते. वस्त्यांधील टवाळखोर मुले मुलींना शिट्ट्या मारणे, छेडछाड करणे यामुळे मुलींचा आत्मविश्वास कमी होतो. अनेक पालकांना मुलींना बाहेर शिक्षणासाठी पाठविणे असुरक्षित वाटते. त्यामुळे मुलींचे शाळागळतीचे प्रमाण वाढले आहे. यासह मुलींचा विवाह लवकर लावून देण्यावर पालकांचा भर असतो. वस्त्यांमधील पानटपऱ्या, हॉटेल, चहाचे स्टॉल्स या ठिकाणी गुंड प्रवृत्तीच्या मंडळींची गर्दी असते. अवैध गुटखा विक्री, जुगार व मटका यामुळे वस्त्यांमधील गल्ल्यांमध्ये दिवस व रात्रभर गर्दी असते. फक्त विकासकामांचा दिखावा करणारे लोकप्रतिनिधी 'माथाडी' या गोंडस नावाखाली गुंड प्रवृत्तीच्या मंडळींची पदाधिकारी म्हणून वर्णी लावतात. हे माथाडीवाले विधीसंघर्षीत मुलांना आपल्या छत्रछायेत ठेवतात. चौकट वर्चस्ववादातून विधी संघर्षीत मुलांमध्ये टोळीयुद्ध वस्त्यांमधील परिसरात आपले वर्चस्व राहण्यासाठी फिल्मीस्टाईल पद्धतीने विधी संघर्षीत मुले टोळीयुद्ध करताना दिसतात. यातून एका गटातील सदस्याचा मारहाण किंवा खून झाला तर दुसरा गट पहिल्या गटातील सभासदांचा बदला घेतात. हे दृष्टचक्र सुरूच राहते. त्यामुळे वस्त्यांधील कोयता गँग अधून मधुन सक्रिय होत असल्याचे एका निवृत्त पोलीस अधिकाऱ्यांनी सीविक मिररशी बोलताना सांगितले. कोट शाळेत जाताना चौका चौकात टवाळखोर मुलांचे गट थांबलेले असतात. कपड्यावरून, सौंदर्यावरून शेरबाजी करतात. मुलींचा मोबाईल नंबर मागतात, फ्रेंडशिपची मागणी करतात. काहीजण तर घरांपर्यंत पाठलाग करतात. छेडछाडीवरून अनेकवेळा भांडणे सुद्धा होतात. म्हणून स्वतः मार्शल आर्ट शिकत आहे. त्यामुळे एक आत्मविश्वास निर्माण झाला आहे. प्रिया खडका सचिव, युथ फॉर चेंज कोट ग्रीनतारा फाउंडेशनमध्ये गेली सात वर्ष कार्यकर्ती म्हणून काम करीत आहे. येथे नेतृत्व कौशल्य शिकले आहे. त्यामुळे जगण्याचा, शिक्षणाचा, सहभागाचा, संरक्षणाचा व विकासाचा हक्क समजून घेतला आहे. त्यामुळे आत्मविश्वास आला. संवादकौशल्य शिकले. आता निर्भीडपणे बाहेर पडते. वस्त्यांमध्ये व्यसनमुक्ती, बालहक्क, बाल कामगार, स्त्री पुरूष समानता या विषयावर पथनाट्य सादर करते. वैष्णवी शिंदे महाविद्यालयीन विद्यार्थीनी

## 'बाप्पाची विनंती '



माझ्या प्रिय मित्रांनो
माझ्या स्वागताची तयारी
केलीत किती छान !
पण एकच विनंती,
आरासा बरोबरच
ध्वनी प्रदूषणाचे
ठेवाल कां थोडं भान !
कारण आपल्या परिसरात
विद्यार्थी ज्येष्ठ नागरिक
आणि काही आजारी
असतात आपलेच शेजारी ।
आणि शिवाय मित्रांनो . .
आधीच आहे माझे
मोठे मोठे कान
जातील ना फुटून !
आणि मग मनापासून
तुम्ही केलेली प्रार्थना
कशी घेता येईल ऐकून ?
निरोपाच्या दिवशी सुद्धा
किती मोठा आवाज
आणि मिरवणूकीची घाई
मला काय वाटतं त्यावेळी
कुणालाच समजत नाही ! .
बघा करा जरा विचार
सामाजिक जाणिवांचे
ठेवावं थोडं भान !
विधायक कार्याने सर्वांनी
माझा उत्सव उत्साहात
करा साजरा तुम्ही छान !



– बाळकृष्ण बाचल, विद्यानगर पुणे ३२
भ्रमणध्वनी ९३७ ३३ १० ९२९

# 'मुक्ती दिनाच्या' निमित्ताने...

इंग्रज भारत देशात आले त्या कालखंडा मध्ये तीन प्रकारच्या राज्य व्यवस्था होत्या.

१) इस्ट इंडिया कंपनीच्या अमला खालील भारत.

२) सरंजामशाही संस्थाने । मांडलिकत्व पतकरलेले राजे.

३) विविध आदिम जमातीची छोटे छोटे राष्ट्रके (राज्य) या तिन्ही राज्य व्यवस्थेचे कायदे व न्याय संस्था वेग वेगळे होत्या.

इंग्रज त्यांचे कायदे चालवित होते त्यांची फौजदारी,दिवाणी न्यायलये होती. देशी संस्थानिक सरजामदार, आपल्या मनाला येईल त्या प्रमाणे प्रजे चे संगोपन व न्याय दान करत होते. विविध आदिम जमातीच्या स्वतंत्र न्याय पंचायती पुर्वीपार चालू होत्या व आज ही त्या चालू आहेत.जमातीच्या कायद्या पलीकडे कोणता ही कायदा मान्य करण्याची या आदिम जमातीची तयारी नव्हती. परंतू इंग्रज राज्य कार्यकत्यनी आक्रमणे करुन आपल्या कायद्या द्वारे इतरची कायदे मोडीत काढले.

आणि इंग्रज या देशात आले त्या वेळचे कालखंडातील तिन्ही राज्य कार्यकर्ता मध्ये संघर्ष खऱ्या अर्थाने सुरु झाला.

सन १८५७ च्या उठावाच्या वेळी या आदिम जमातीने ठिक ठिकाणी छोटे मोठै उठाव सुरु केले परंतू इंग्रजाच्या सैन्या पुढे या आदिम जमाती चे पारंपारिक शस्त्रे गळून पडले.

सन १८५७ चा उठाव ब्रिटिशांनी मोठया आकल व हुशारीने मोडून त्याचा बिमोड केला.

त्या वेळी इंग्रजांनी धोके व पुढचे आडचण ओळखून १८६० मध्ये १८६० चा शस्त्रास्त्रबंदीचा कायदा व १८७१ चा गुन्हेगारी जमातीचा कायदा आणून हे हत्यार म्हणून इंग्रजांनी वापरण्यास सुरुवात केले.

परंतू भारत देशात इंग्रजां विरुद्ध उठाव करणाऱ्या लोकांचा व टोळक्याचा पराभव ब्रिटिश सरकार करु शकत नव्हेत या बंडखोर टोळक्यांना व त्यांच्या बायका पैरांसह अटक करुन विस्थापित करण्यात आले.

सन १९०८ साली संबंध भारत देश भर वसाहतीचा कायदा लागू केला गेला व गुन्हेगारीच्या स्वतंत्र वसाहती.

म्हणजेच ''सेटलमेंट '' म्हणजेच खुला तुरुंग जेल (तारेचा कुंपण) निर्माण करण्यात आले या तुरुंगात कैकाडी पामलोर, छप्परबंद, बेस्तर, टकारी पारधी, कंजारभाट, मांगगारुडी, रजपूत भामटा फक्त या ९ जमातींनाच बंदिस्त केले गेले....

तामिळनाडू , केरल, आंध्र, कर्नाटक, गुजरात,या राज्यातून बंडखोर त्या वेळच्या मुंबई इलाख्यातून म्हणजेच आजचा (महाराष्ट्र) आणले पजांब उत्तर प्रदेश, राज्यस्थान, बिहार, मध्य प्रदेश, सिंध या प्रारांतून गुन्हेगार टोळया तर मुंबई इलाख्यातील (महाराष्ट्र) बंडखोरांना अन्य राज्या मध्ये पाठवून त्यांना रोज हजेरी लावण्यात आल्या या सर्व घडामोडी आज तगायत आपले राज्यकर्ते सह शासन दरबारी कोणी दखल घेतले नाही किंवा लिहिण्यात आले नाही.

याचे मला व माझ्या माजी गुन्हेगार समाजातील भटक्यानां खंत वाटते.

१८७१ चा कायदा म्हणजे मानवतेच्या इतिहासातील एक काळयाकुठ प्रर्वाची सुरुवात होती. हजारो, लाखो कुटुंबाणा व काही वेळेस गाव च्या गाव गुन्हेगार म्हणून इंग्रजांनी जाहीर केले. आम्हा लोकांना किमान माणुसकीचे हक्क ही नाकारण्यात आले १८७१ ते १९०८ या कालखंडात सर्व गुन्हेगार समाजाची म्हणजेच आमची प्रचंड ससेहोलपट झाली. या कायद्या मुळे ब्रिटिश राज्यकर्तांनी हा गुन्हेगार वसहातीत मनात येईल तसे म्हणजेच लहरी नुसार माणसे डांबण्याचे केडिवाडे करत होते. जसे की मोकाट जनावरे गुरे डांबण्याचे पांजरापोळ सारखे करत आम्हाच्या वर अन्य करत होते. ब्रिटिश लोक कायद्याच्या राज्याला मानणारे अशी त्यांची जगात असलेली प्रतिमा नांव लौकिक हा खोटा पडला व त्याचा हा बुरखा सपशेल फाटला.

१८७१ च्या गुन्हेगार जमाती चा कायदा आस्तित्वात आला हा कायदा.

१९०८ मध्ये संबंध देशभर लागू करण्यात आले त्या प्रमाणे संपूर्ण भारतात ५२ सेटलमेंट स्थापना करण्यात आले त्या नंतर मुंबई इलाख्या मध्ये गुन्हेगार जमातीच्या वसहातीचा कायदा १९०९ मध्ये आस्तित्वात येवून.

श्री अ. क इ. स्टार्ट ( I.C S ) हया



आधिकाराच्या देखरेख खाली सोलापूर येथे सन १९१२ मध्ये सध्या असलेले जेल (तुरुंग) च्या उत्तरेस ''कल्याणपूर'' नावाने सेटलमेंट ची स्थापना केली.

शहराच्या मध्य भागी गुन्हेगार जमाती ची वसाहत येत असल्याने मुंबई गवर्मेंट आदेश क्रमांक १३२९५ अन्वये ''कल्याणपुर'' वहसात ही सध्या च्या ठिकाणी म्हणजेच' उमेदपूर सेटलमेंट सोलापूर' नावाने वसविण्यात आले.

सन १९०८ नंतर गुन्हेगार जमाती च्या वसहातीचा कायदा आला आणि या जमाती मध्ये कुटूंबाच्या कुटुंब कोंड वाडयात टाकलेल्या गुरां सारखी तीन तारां च्या कुंपणात अडकवली गेली.

वसहात अधिकारी सांगेल त्या वेळी आणि सांगेल तितके वेळी हजेरी, वाटेल त्या वेळी बायका मुलांच्या झड त्या आणि अंगझडत्या, धर्मातराचे दबाव, किरकोळ गुन्हा साठी जन्मठेपे सारख्या शिक्षा अशा काळ्या कुठ प्रसांगानी गुन्हेगार जमाती चा इतिहास भरलेले आहे.

या कायद्याने वसहातीतील गुन्हेगार नसणाऱ्यांनी सुध्दा पोलिस स्टेशनला वेळोवेळी हजेरी दयावी लागत होते.

पोलीस मनात येईल तेंव्हा गिणती (मोजणी) करत होते रात्री बेरात्री झोपडीत येत होते.

नवरा बायको झोपलेले असेल तेंव्हा देखील आमच्या लोकांना उठवून झाडाझडती घेत होते.

त्यालाच सेटलमेंट असा शब्द दिला आहे सेटलमेंट म्हणजे स्थान बद्धता त्यामुळे तारेच्या कुंपणा बाहेर जाण्याची परवानगी सुध्दा नाही.

जेव्हा देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा सुद्धा आम्ही सगळेजण तारेच्या कुंपणात खुला कारागृहात (जेल) होतो.

देशासाठी ज्यांनी त्याग केला तुरुंगात गेले अशा आमच्या लोकांना स्वातंत्र्या नंतर पाच वर्षांनी सेटलमेंट येथे देशाचे पहिले तत्कालीन सन्मानिय पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी येवून तारेचे कुपंन म्हणजेच खुला कारागृह तोडून मुक्त केले.

परंतु सेटलमेंट मधील गुन्हेगार समाजातील लोकांना मुक्त करुन स्वतंत्र केले असे संबोधित केले पण खऱ्या अर्थाने आजून आम्ही स्वातंत्र्य झालोच नाही असे आम्हाला खेदाने म्हणाव्हे वाटतो त्यांचे कारण सुध्दा तसेच आहे देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पाच वर्षांनी म्हणजे ३१ ऑगस्ट १९५२ रोजी सेटलमेंट मधील माजी गुन्हेगार समाज मुक्त झाले. परंतु पुन्हा आम्हाला पोलीस पकडतील म्हणून आम्ही दूर रानात जंगलात, डोंगरात कुठेतरी लपून राहात होतो. आम्हच्या विमुक्त समाजातील बांधवांसाठी आजच्या लोकशाही देशात समानतेच्या देशात प्रजासत्ताक देशात आम्हाला माणूस म्हणून जगण्याची संधी देण्याची गरज आहे. गुलामगिरीच्या बेड्या तुटल्या हातात पाठी पेन्सिल आली.

पण अजूनही हे आम्हाला सारे फेकलेले तुकडे वाटतात.

आमच्या मतांना कोणी किंमत देत नाही कोणाच्या सुवर्णाच्या देवघरापर्यंत आम्ही जाऊ शकत नाही कुणी सव्वा शिन म्हणून आमच्या बायकांना महिलांना बोलवत नाही.

आम्हाच्या साठी शिक्षणाची दार उघडतात ज्ञानाची दार उघडत नाहीत

गुणवत्ता वर्धन आणि माणूस म्हणून आमच्याशी वर्तन होण्याची अंत्यत गरज आहे. म्हणून आमच्या समाजाचं पुनर्वसन व्हावं हीच आमची अपेक्षा आहे आमचे आई बहिणींना लहान मुलांना सुद्धा ब्रिटिशांनी बंदिस्त केले होते व आम्हाला चांगले जीवन जगण्यासाठी ब्रिटिशांनी प्रशिक्षण देण्याचे प्रयत्न केला. परंतु आमचा समाज त्यांच्या अमिषा पुढे व त्यांच्या साहानभूतीला बळी पडले नाही. देश स्वतंत्र मिळवल्या शिवाय त्यांच्याविरुद्ध आक्रमण आमच्या समाज केलेला होता त्यात अनेक लोकांचे बळी सुद्धा गेलेले आहेत. सन १९४७ मध्ये जेव्हा देश स्वतंत्र झाला तेव्हा आम्हाला स्वतंत्र मिळालेला नाही.

आम्हाला ३१ ऑगस्ट १९५२ रोजी १८७१ हा गुन्हेगारी कायदा रद्द करून मुक्त करण्यात आले.

पाच वर्षे आम्ही गुलामगिरी मध्ये स्वतंत्र भारतामध्ये राहिलेला आहे.

जे स्वतंत्र समाज स्वतंत्र साठी युद्ध पुकारलेले समाजाला या स्वतंत्र भारताच्या सरकारने पाच वर्षांनी स्वतंत्र केले.

हे खेदाने आम्हाला आज म्हणावं लागत आहे. तेव्हा आम्हाला खुला कारागृह तारे च्या कुंपनीतून मुक्त करण्यात आले तेव्हा आम्हाला रोजगार नाही घर नाही जगण्यासाठी काही योजना त्या वेळेचे तत्कालीन सरकार उपलब्ध करुन दिले नाही. देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी यांनी आमच्या समाजाला मोठे मोठे आश्वासन दिले परंतु आमची प्रगती आम्हाला काही मिळवून दिलेले नाही. आम्हाला अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट करण्याचा अत्यंत गरजेचा असताना देखील.

सन १९६१ ला विमुक्त जातीय संवर्गात समावेश केले व आम्हाला भंटकती करण्यासाठी मोकळे केले.

आजपर्यंत तत्कालीन सरकारने आम्हाला गाजरच दिले आहे हे वस्तु स्थिति आहे.

**पत्रकार:– राम (कैकाडी) गायकवाड**
उमेदपूर सेटलमेंट सोलापूर

# वायू प्रदूषणावर नियंत्रण कमिटी नावाला

शहरातील मोठ्या प्रमाणावर होणारी बांधकामे त्यातून होणारे हवेचे प्रदूषण यासह महापालिकेचे आरोग्य कर्मचारीच जागोजागी जाळत असलेला सुका कचरा यामुळे दिवसेंदिवस हवेची गुणवत्ता पातळी ( एएसआय) घसरत असल्याचे चित्र आहे. शहरातील अनेक सोसायट्या सुका कचरा व पालापाचोळा परिसरात जाळतात त्यामुळे हवेतील कार्बनडायऑक्साइडचे प्रमाण वाढत आहे.

पुणे महापालिकेने क्षेत्रीय कार्यालयातील सहाय्यक आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली वायू प्रदूषण नियंत्रण समिती स्थापन केली आहे. यामध्ये उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, आरोग्य निरीक्षक व मुकादम यांचा समावेश आहे. या समिती क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत होणाऱ्या वायू प्रदूषण थांबवून उपाययोजना करणे अपेक्षित आहे. मात्र, उपायोजना तर सोडा पण जागोजागी सुका कचरा जाळण्यावर प्रतिबंध करताना दिसत नाही. सध्या मोठ्या प्रमाणात वृक्षांची पानगळ होत आहे. आरोग्य कर्मचारी ते गोळा



करून जाळतात. त्यामुळे सकाळीच हवेची गुणवत्ता ढासळत आहे. व्यायामासाठी बाहेर पडणाऱ्याना या धुराचा सामना करावा लागतो. यासह अनेक सोसायट्यांमध्ये ओला कचरा जीरवण्यासाठीचे गांडूळखत, व्हर्मिकल्चर प्रकल्प बंद आहेत. त्यामुळे ते सुका कचरा जाळून ओला कचरा महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या घंटा गाडीला देतात. असा कचरा सोसायटीच्या आवारातच जाळत असल्यामुळे काही प्रमाणात सुक्या कचऱ्या सोबतच ओला कचरा जाळत असल्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरलेली असते. याची तक्रार मात्र सोसायटीचे सभासद करीत नाहीत. शहरातील अनेक सोसायट्या सुका कचरा त्यांच्याच आवारात जाळतात. उदाहरण द्यायचे तर जेल क्वार्टर्स, मनोरुग्णालय कर्मचारी वसाहत, शास्त्रीनगर शासकीय कर्मचारी वसाहत, प्रिझन प्रेस कर्मचारी वसाहत, विश्रांतवाडी पोलीस कर्मचारी वसाहत आदि ठिकाणी मोठ्या प्रमाणात दररोज सुका कचरा जाळला जातो. त्यामुळे हवेचे प्रदूषण वाढते. एखाद्याने वैयक्तिक कचरा जाळला तर पाचशे रूपये दंड आहे. मात्र हाच कचरा एखाद्या सोसायटीने जाळला तर २५ हजार रूपयापर्यंत दंड आहे. यामध्ये अनारोग्यस्थिती निर्माण झाली किंवा प्लॅस्टिक जाळल्यास जास्त दंड आकारला जातो. मात्र, प्रत्येक वेळी हे दंड केलेच जाते असे नव्हे. शहर व परिसरात अनेक सरकारी कार्यालये आहेत. यासह येरवडा कारागृह, मनोरुग्णालय, डेक्कन कॉलेज, वस्तू व सेवा कर कार्यालय, सर्वे ऑफ इंडिया आदी कार्यालय नियमित सुका कचरा जाळतात. मात्र येरवडा क्षेत्रीय कार्यालयाने आतापर्यंत कधीच त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली नाही. ते कचरा जाळतच असतात. त्यामुळे परिसरात हवेची गुणवत्ता ढासळते.

## पक्ष्यांची ओळख पोपट

हा सर्वपरिचित पक्षी आहे. पोपटाची चोच लाल-भडक असते. काळ्या रंगाच्या डोळ्या-भोवती पांढऱ्या व नारिंगी रंगाची गोल कडा दिसून येते. गळ्याभोवती लाल-काळ्या रंगाचा गोफ असतो. मादी पक्ष्याच्या गळ्यात मात्र, असा गोफ नसतो. पोपटाची शेपटी लांब टोकदार असून शेपटी मध्ये निळ्या पांढऱ्या रंगाची पिसे असतात. किक, किक, किक असा आवाज काढत एकमेकांना साद देत असतात. झाडांवरील फळे हे मुख्य खाध्य असून, पोपट शक्यतो झाडाच्या ढोलीत राहतात. किंवा दगडी भिंतीच्या फटीमध्येहि घरटे करतात. जोडीने अथवा थव्याने वावरताना दिसतात. सकाळी व संध्याकाळी उंबर, वड, पिंपळ या वृक्षांची फळे टिपण्यासाठी उड़त जाताना त्यांचा एकमेकांना साद देतानाचा आवाज लक्ष वेधून घेतो.



विणीचा हंगाम – जानेवारी ते मे.

**– दिपक शिंदे. (पक्षिमित्र व निसर्ग अभ्यासक)**

# लोहगाव विमानतळाशेजारी उंच उंच इमारती

लोहगाव विमानतळ परिसरात अनेक उंच इमारतींचे बांधकाम सुरू आहे. या परिसरात इमारतींचे बांधकाम करताना उंचीच्या मर्यादांचे पालन करावे, असा आदेश आहे. मुंबई उच्च न्यायालयाने देखील मुंबई विमानतळ परिसरात असलेल्या ४८ उंच इमारती पाडण्याचे आदेश दिले आहेत. असे असतानाही पुणे महापालिकेच्या बांधकाम विभागाने लोहगाव विमानतळ परिसरात अनेक उंच इमारतींना परवानगी दिली आहे. या बांधकाम व्यवसायिकांनी सर्व नियम धाब्यावर बसवून बांधकामे केली आहेत. तर महापालिकेच्या बांधकाम विभागाने, हवाई दलाने ना हरकत परवानगी दिल्यामुळे ही सर्व बांधकामे अधिकृत असल्याची सारवासारव केली आहे.

रामवाडी ते लोहगाव विमानतळ रस्त्यावर अगदी विमानतळाच्या हाकेच्या अंतरावर भव्य गृह व व्यापारी संकुल उभे राहत आहे. रस्त्याला खेटून ही बांधकामे होत आहेत. पंधरा ते अठरा मजल्यांच्या इमारती उभ्या राहत आहेत. लोहगाव विमानतळ हे हवाई दलाच्या ताब्यात आहे. देशाच्या मध्यवर्ती भागातील अतिशय सुरक्षित विमानतळ समजले जाते. या ठिकाणी 'बॉम्ब ड्रम' आहे. देशाच्या सुरक्षेसाठी कोणतीच तोडजोड केली जात नसते. पठाणकोट हल्ल्यानंतर देशातील सर्व विमानतळांच्या सिमाभिंतीपासून शंभर मीटरच्या आत बांधकामांना परवानगी नाही. यासह 'बॉम्ब ड्रम'पासून नऊशे मीटरवर सुद्धा बांधकामे केली जात नाहीत. असे असतानाही बलाढ्य संपत्ती असलेल्या बांधकाम व्यवसायिकांना सहज ना हरकत परवानगी मिळते कशी या बाबत उलट सुलट चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे.

पुणे महापालिका बांधकाम विभाग त्यांना एक खिडकी योजनेप्रमाणे सर्व परवानगी तातडीने घरपोच कशी देतात. तर दुसऱ्या बाजुला अर्धा व एक गुंठा जागेवर बांधकाम करणाऱ्यांना परवानगीसाठी बांधकाम विभाग अनेक हेलपाटे मारायला लावतो. यावर बांधकाम व्यवसायिकांची पोच कोठपर्यंत असू शकते, याचा अंदाज येतो, अशा प्रतिक्रीया सर्व सामान्य नागरिकांनी दिल्या आहेत. विमानतळ परिसरातील उंच इमारतींमुळे विमान उड्डाणास अडथळे निर्माण होतात. यामुळे अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. आता या प्रकरणाची दखल थेट मुंबई उच्च न्यायालयाने घेतली आहे. विमानतळ परिसरात ४८ इमारतींचे मजले पाडण्यासाठी कशा प्रकारे कारवाई करणार आहात, असा सवाल उच्च न्यायालयाने राज्य सरकारला केला आहे. याबाबत कारवाई करण्याची संपूर्ण जबाबदारी ही जिल्हाधिकाऱ्यांचीच असल्याचे न्यायमूर्तींनी म्हटले आहे. लोहगाव विमानतळ परिसरात होणाऱ्या बांधकामांचे काय? न्यायालयाने दखल घेतल्यानंतर या इमारती पाडणार का, असा



प्रश्न सर्वसामान्य नागरिकांनी उपस्थित केला होता. नुकत्याच एका जनहित याचिकेवर सुनावणी करताना उच्च न्यायालयाने राज्य सरकारसह पुणे महापालिका व हवाई दलाला या बेकायदा बांधकामा बाबत फटकारले आहे. अतिशय संवेदनशील व महत्त्वाच्या हवाई दलाच्या विमानतळाशेजारी बांधकामे कशी झालीत या बाबत शंका व्यक्त करीत त्यांच्यावर कारवाई बाबत अहवाल मागितला आहे.

**बांधकाम व्यवसायिकांना महापालिकेत रेड कारपेट**

महापालिकेच्या बांधकाम विभागत शहरातील बांधकाम व्यवसायिकांना रेड कारपेट असते. बांधकाम व्यवसायिक व शहर अभियंता यांच्या दरम्यान मध्यस्थी करणारे अनेक माजी नगरसेवक आहेत. ' लायझनिंग ' या गोंडस शब्दाने ही कामे होतात. त्या बद्दल्यात बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियत्यांपासून ते अति वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत टक्केवारी ठरलेली असते. त्यामुळे शहरात गृह व व्यापारी प्रकल्प उभारणाऱ्यांना बांधकाम व्यवसायिकांना विना सायास परवाने मिळतात. महापालिकेतील अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांचा कोट्यावधी रूपयांचा पैसा बांधकाम व्यवसायात गुंतविल्याची जोरदार चर्चा महापालिके रंगलेली असते. तर काहींनी भागिदारीत बांधकाम व्यवसायिकां बरोबर गृह व व्यापारी प्रकल्प सुरू केला आहे. स्वत: कडील काळा पैसे पांढरा करण्याचे चांगले माध्यम त्यांनी निवडले असल्याचे चांगल्या व प्रामाणिक अधिकाऱ्यांमध्ये चर्चा रंगलेली असते.

**संरक्षण दलातील ना हरकत मिळवून देतात दलाल**

शहरातील बांधकाम व्यवसायिकांना संरक्षण दल असो कि हवाई दलातील ना हरकत प्रमाणपत्र आणून देण्याचे काम दलाल किंवा मध्यस्थ करीत असतात. त्यासाठी बांधकाम व्यवसायिक कोटयावधी रूपये मोजतात. त्यामुळे लोहगाव विमानतळ सारख्या अतिशय संवेदनशील ठिकाणी उंच उंच इमारती उभ्या राहिल्या आहेत. एका प्लॅटची किंमत तीने ते साडेतीन कोटी रूपये तर व्यवसायिक दुकानांची किंमत चार ते पाच कोटी रूपये आहे. त्यामुळे एखाद्या फ्लॅट किंवा दुकानांच्या बदल्यात ना हरकत प्रमाणपत्र देऊन देशाच्या सुरक्षेशी विकायला काढल्याची गंभीर स्थिती निर्माण झाली आहेत

'दैनिक महा मेट्रो', मालक, प्रकाशक, संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे, यांनी श्री समर्थ प्रिंटर्स, शॉप नंबर १, बेसमेंट वर्तक अपार्टमेंट, ४९९, शनिवार पेठ, पुणे- ४११०३० येथे छापून फ्लॅट नंबर ९, फ्रेंन्ड्स पॅराडाईज, शिरोळे रोड, शिवाजीनगर, पुणे ४११००४ येथे प्रकाशित केले.
वृत्तपत्रात छापलेल्या बातम्या, लेख, छायाचित्रे व जाहिराती यांच्याशी संपादक सहमत असेल असे नाही. कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.
मालक, प्रकाशक आणि संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे – ९९२२९३०१९५, कार्यालय संपर्क क्रमांक : ९९७०६८८८६५ ( पी.आर.बी. कायद्याअंतर्गत बातम्याच्या निवडीसाठी जबाबदार.) Email : Mahametronews.pune1gmail.com

This 'Daily Maha Metro', Owner, Publisher by Dilip Kisan Kurhade printed at Shree Samarth Printers, Shop No. 1, Basement Vartak partment, 499, Shaniwar Peth, Pune 411030, Published from Flat No. 9, Friends Paradise Society, Shirole Road, Shivajinagar, Pune-411004.The editor does not necessarily agree with the news, articles, photographs and advertisements printed in the newspaper. Legal matters will be resolved under Pune Courts. Owner, Publisher Editor Dilip Kisan Kurhade Contact No. - 9922930195, Office Contact No. - 9970688865 (Responsible for selection of news under PRB ct.) Email. - Mahametronews.pune@1gmail.com

पान १ वरून

### चार हजार क्षमतेचे कच्च्या कैद्यांसाठी दोन नवीन कारागृहांचा प्रस्ताव लालफितीत !

गोदाम, रुग्णालय, प्रयोगशाळा, औषधांची खोली, वैद्यकीय अधिकाऱ्यांची खोली, पन्नास खिडक्यांची मुलाखत कक्ष, ग्रंथालय, प्रतिक्षालय, सराईत गुन्हेगारांसाठी अतिसुरक्षित तीस खोल्या आदी सोईसुविधा असणार आहे.

नवीन फौजदारी न्यायालयाची इमारतीचे आराखडा तयार केला आहे. यामध्ये दोन तळमजली वाहनतळ, आठ मजली इमारतीत २४ न्यायालय असणार आहेत. यामध्ये केवळ फौजदारी खटले चालविले जाणार आहेत. येरवडा मध्यवर्ती कारागृहात दरवर्षी विविध गुन्ह्यातील बारा ते पंधरा हजार आरोपी दाखल होत असतात. यातील सत्तर टक्के कच्चे कैदी असतात.

या सर्वांचे खटले फौजदारी न्यायालयात चालतात. त्यामुळे आरोपींना न्यायालयात हजर करणे, त्यानंतर कारागृहात घेऊन जाणे हे अवघड असते. त्यामुळे येरवडा कारागृहाच्या अवध्या दीडशे ते दोनशे मिटर अंतरावर न्यायालय होणे हे पोलिस, न्यायालय आणि कारागृहाच्या सोईचे तर आहे. यासह वेळेची, पैशाची बचत होणार आहे.

# आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना त्वरित संपर्क व जलद प्रतिसादासाठी नियंत्रण कक्ष अधिक सक्षम करण्यावर भर

## अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील; अग्निशमन विभागाचा घेतला आढावा, गणेशोत्सव व पूरस्थितीवर सज्जतेचे निर्देश

**पिंपरी । प्रतिनिधी**

आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना त्वरित संपर्क व जलद प्रतिसादासाठी अग्निशमन विभागाचा नियंत्रण कक्ष नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक सक्षम केला जात आहे. हे नवीन तंत्रज्ञान कसे वापरावे, याचे प्रशिक्षण नियंत्रण कक्षातील कर्मचाऱ्यांना द्या. नागरिकांकडून आपत्तीबाबत मिळणाऱ्या माहितीचे व्यवस्थित संकलन केले जात आहे का, याची वेळोवेळी खात्री करा, असे निर्देश पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी दिले. आपत्ती काळात अग्निशमन विभागाचा सध्याचा प्रतिसाद वेळ आणखी कमी करून तो अधिक परिणामकारक कसा करता येईल, याकडे लक्ष देण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.






पिंपरी चिंचवड महापालिकेच्या संत तुकाराम नगर येथील अग्निशमन विभागाच्या मुख्य कार्यालयाला भेट देऊन जांभळे पाटील यांनी येथील कामकाजाचा आढावा घेतला. या प्रसंगी सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, सहशहर अभियंता अनिल भालसाकळे, उपअग्निशमन अधिकारी ऋषीकांत चिपाडे, कार्यकारी अभियंता महेश कावळे व इतर अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. यावेळी नियंत्रण कक्षात जाऊन सिस्टिमची माहिती घेताना त्यांनी फोन प्रतिसादाची तत्परता तपासली. नियंत्रण कक्षाला फोन आल्यानंतर किती वेळात प्रतिसाद मिळतो, कोणती माहिती घेतली जाते, ती माहिती घेण्यासाठी किती वेळ लागतो, संबंधित माहिती अग्निशमन विभागाच्या पथकापर्यंत किती वेळात जाते, हे देखील त्यांनी तपासले. नियंत्रण कक्षातील सिस्टिम यूजर-फ्रेंडली असावी, याकडे लक्ष दिले आहे. ती योग्य पद्धतीने वापरण्याचे प्रशिक्षण या विभागातील प्रत्येक कर्मचाऱ्याला देण्यात यावे. आपत्तीचा प्रकार पाहून आपण त्या ठिकाणी कोणती पथके पाठवायची, याचे नियोजन केले आहे. तेथील लोकेशन कसे शेअर करता येऊ शकते, याकडेही लक्ष देणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने नियोजन करा, असेही ते म्हणाले.

**असे चालते नियंत्रण कक्षाचे कामकाज**

अग्निशमन नियंत्रण कक्षात आपत्कालीन फोन आल्यानंतर त्वरित प्रतिसाद देण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. कॉल आल्यावर नियंत्रण कक्षातील स्क्रीनवर एक डिजिटल फॉर्म आपोआप उघडतो. या फॉर्ममध्ये संबंधित घटनेबाबतची प्राथमिक माहिती जसे की घटना घडलेले ठिकाण, आपत्तीचा प्रकार, किती लोक अडकल्याची शक्यता, तसेच कॉल करणाऱ्याचे नाव व संपर्क क्रमांक अशी माहिती भरली जाते. फॉर्म पूर्ण भरल्यानंतर संबंधित माहिती जवळच्या अग्निशमन केंद्राला तात्काळ पाठवली जाते, जेणेकरून बचाव पथक त्वरित घटनास्थळी रवाना होऊ शकेल. याशिवाय, प्रत्येक कॉलची नोंद प्रणालीत सुरक्षित ठेवली जाते.

**गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर यंत्रणा सज्ज ठेवा**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवण्यात यावी, असे निर्देश देतानाच जांभळे पाटील म्हणाले, "गणेशोत्सव काळात शहरात मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होते. मिरवणुका, मंडप, रोषणाई यामुळे अपघात किंवा आपत्कालीन घटना घडण्याची शक्यता वाढते. त्यामुळे अग्निशमन विभागाने सर्व उपकरणे कार्यरत स्थितीत ठेवावीत. मंडप उभारणीसाठी अग्निसुरक्षा नियमांचे पालन झाले आहे का, याची तपासणी करा. गर्दीच्या ठिकाणी अग्निशमन पथके सतत सतर्क ठेवा. नियंत्रण कक्षातील हेल्पलाइन नंबर अधिक नागरिकांपर्यंत पोहोचवा, जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ संपर्क साधता येईल. मिरवणुकीदरम्यान वाहतूक, वीज आणि इतर विभागांशी समन्वय ठेवून कार्यवाही करा. गणेशोत्सव काळात कोणतीही आपत्ती उद्भवल्यास त्वरित प्रतिसाद देणे ही आपली प्राथमिक जबाबदारी आहे."

**पूरजन्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी सज्ज**

पिंपरी चिंचवड शहरातून पवना, इंद्रायणी, मुळा नद्या वाहत असून या नद्यांवरील धरणे जवळपास पूर्ण क्षमतेने भरली आहेत. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचे प्रमाण वाढल्यानंतर धरणातून नदीपात्रात विसर्ग सुरू करण्यात येतो. त्यामुळे नदीची पाणीपातळी वाढून शहरात पूरजन्य परिस्थिती उद्भवण्याची शक्यता लक्षात घेऊन अग्निशमन विभागातील 'जलपरी' या विशेष वाहनाचीही जांभळे पाटील यांनी पाहणी केली. यामधील बोटी, लाईफ जॅकेट, रोप, ओबीएम, बचाव साहित्य यांची कार्यक्षमता तपासण्यात आली. आपत्तीच्या वेळी त्वरित बचावकार्य सुरू करता यावे, यासाठी पथके आणि साहित्य सदैव तत्पर ठेवा, अशा सूचना त्यांनी दिल्या. नदीकाठावरील व पाणथळ भागातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आधीच नियोजन करावे. नियंत्रण कक्षाशी समन्वय ठेवून जलपरी वाहन व पथकांना आवश्यक तेथे तत्काळ रवाना करण्याची तयारी ठेवा. आपत्कालीन स्थितीत जीवितहानी होऊ नये, यासाठी प्रत्येक क्षण महत्त्वाचा आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

# गर्दीत सोन्याची चैन लांबवणारे चोर जेरबंद

**पुणे । प्रतिनिधी**

गर्दीच्या बसमधून प्रवाशांची सोन्याची चैन लंपास करणाऱ्या दोन चोरांना पर्वती पोलिसांनी मुद्देमालासह अटक केली आहे. या कारवाईत दोन तोळे वजनाची सोन्याची चैन जप्त करण्यात आली आहे.

फिर्यादी महिला बालाजीनगर ते एस.टी. कॉलनी बीआरटी बसस्टॉपपर्यंत प्रवास करत होत्या. त्या वेळी बसमध्ये झालेल्या प्रचंड गर्दीचा फायदा घेत अज्ञात इसमाने त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन हिसकावून नेली. या प्रकरणी फिर्यादींनी पर्वती पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली होती. त्यानुसार गुन्हा क्रमांक २५५/२०२५ भा.दं.वि. कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

तक्रारीनंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक नंदकुमार गायकवाड व गुन्हे निरीक्षक अनिता हिवरकर यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथक तयार करण्यात आले. तपास उपनिरीक्षक किरण पवार यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी तपास सुरू केला. या दरम्यान अंमलदार सद्दाम शेख यांना त्यांच्या खास बातमीदारामार्फत माहिती मिळाली की चोरी प्रकरणात दोन आरोपींचा सहभाग आहे.

त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून आरोपींना शिताफीने अटक केली. अटक केलेल्या आरोपींची नावे अमर शंकर जाधव (वय ३८, रा. पिंगळे वस्ती, पासपोर्ट ऑफिसजवळ, पुणे) व निलेश शंकर जाधव (वय ३६, रा. रेणुका माता मंदिर गायरान वस्ती, केशवनगर, मुंढवा, पुणे) अशी आहेत. त्यांच्या ताब्यातून दोन तोळे वजनाची सोन्याची चैन जप्त करण्यात आली आहे.

ही कारवाई मा. अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे शहर राजेश बनसोडे, मा. पोलीस उपायुक्त परि-०३ पुणे शहर संभाजी कदम व मा. सहाय्यक पोलीस आयुक्त सिंहगड रोड विभाग अजय परमार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# पिंपरी चिंचवडची पर्यावरणपूरक धोरणे पाहून आंध्र प्रदेश शिष्टमंडळ प्रभावित!

**पिंपरी । प्रतिनिधी**

आंध्र प्रदेश राज्यातील विविध महापालिका व संस्थांचे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कचरा व्यवस्थापन प्रकल्पांचा अभ्यास करण्यासाठी विशेष दौऱ्यावर आले होते. त्यांनी शहरातील विविध प्रकल्पांची पाहणी करताना पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पर्यावरणपूरक धोरणांबद्दल समाधान व्यक्त केले.




> पिंपरी चिंचवड महापालिकेने घनकचरा व्यवस्थापन क्षेत्रात शाश्वत व नाविन्यपूर्ण उपाययोजना राबविल्या आहेत. शहरातील प्रत्येक नागरिकाला स्वच्छतेची सुविधा उपलब्ध करून देणे हे आमचे प्रमुख ध्येय आहे. नागरिकांचा सहभाग, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व काटेकोर नियोजन यांच्या जोरावर आज महापालिकेने घनकचरा व्यवस्थापनात एक आदर्श उभा केला आहे.
> – शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका

शिष्टमंडळात तडीपात्री महापालिकेचे आयुक्त एस. शिव रामकृष्णा, विशाखापट्टणम महापालिकेचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. ई. एन. व्ही. नरेशकुमार, कार्यकारी अभियंता के. गुरप्पा यादव, कार्यकारी अभियंता एम. नारायण स्वामी, तांत्रिक तज्ज्ञ श्रीनिवास रेड्डी, वरिष्ठ प्रकल्प सहकारी (सीडीएमए) एम. डी. जावेद आणि प्रकल्प सहकारी (स्वच्छ आंध्र कॉर्पोरेशन) एस. डी. रहतुल्लाह यांचा समावेश होता. यासर्वांना आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, उपायुक्त सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकारी अभियंता हरविंदरसिंग बन्सल, ह क्षेत्रीय कार्यालय सहाय्यक आरोग्य अधिकारी अंकुश झिटे, कनिष्ठ अभियंता दशरथ वाघोले आणि कनिष्ठ अभियंता स्वालीहा मुल्ला यांनी विविध प्रकल्पांची माहिती दिली. आंध्र प्रदेश राज्यातील शिष्टमंडळाने शहरातील आरोग्य विभाग व पर्यावरण विभाग यांच्या अधिपत्याखाली चालू असलेले दारोदारी कचरा संकलन व वर्गीकरण प्रक्रिया, दापोडी येथील शून्य कचरा प्रकल्प, कचरा ट्रान्स्फर स्टेशन, मोशी येथील बांधकाम राडारोडा प्रक्रिया प्रकल्प, बायो मिथीलेशन प्रकल्प आदी महत्त्वपूर्ण उपक्रमांचा आढावा घेत प्रत्यक्ष पाहणी दौरा केला. शहरातील निवासी संकुले, औद्योगिक क्षेत्रे, व्यावसायिक आस्थापना, रुग्णालये, भाजीबाजार यांसारख्या विविध स्रोतांमधून निर्माण होणारा घरगुती कचरा, प्लास्टिक, पालापाचोळा, उरलेले अन्न, जैविक व अजैविक कचरा, ई-कचरा तसेच जैववैद्यकीय कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्याचे काम महापालिकेकडून केले जाते, या संपूर्ण प्रक्रियेची माहिती शिष्टमंडळाने जाणून घेतली.

> पिंपरी चिंचवड महापालिका ज्या पद्धतीने कचऱ्याचे विभाजन आणि सर्व प्रकल्पांची देखभाल करत आहे, तो इतर शहरांसाठी एक आदर्श आहे. तसेच महापालिकेची धोरणे ही खऱ्या अर्थाने पर्यावरणपूरक असून, ही धोरणे विशाखापट्टणम महापालिकेतही राबविण्याचा आमचा मानस आहे.
> – डॉ. ई. एन. व्ही. नरेशकुमार,
> मुख्य वैद्यकीय अधिकारी विशाखापट्टणम महापालिका

> मोशी येथे उभारण्यात आलेला कचरा प्रक्रिया प्रकल्प, तसेच शहरात उभारलेली ट्रान्स्फर सेंटर्स ही स्वच्छतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पावले आहेत. कचरा संकलन, वर्गीकरण आणि त्याचे वैज्ञानिक व्यवस्थापन करण्यासाठी वेगवेगळे प्रकल्प उभारण्यास पिंपरी चिंचवड महापालिकेचा प्रयत्न असतो. हे प्रकल्प पाहण्यासाठी विविध राज्यांतून शिष्टमंडळे येतात. यावरून प्रकल्पाचे यश सिद्ध होते.
> – विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

# पुणे मेट्रोकडून गणपती दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना विशेष आवाहन

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरातील मध्यवस्तीतील गणेश मंडळांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची वाढती संख्या लक्षात घेऊन, पुणे मेट्रोने गणेशोत्सवाच्या काळात प्रवाशांसाठी विशेष आवाहन केले आहे. पुणे मेट्रोची स्वारगेट, मंडई आणि कसबा पेठ ही स्थानके आता प्रवासी सेवेसाठी पूर्णपणे कार्यान्वित झाली आहेत. सध्या पुणे मेट्रोची दैनंदिन प्रवासी संख्या २ लाख १५ हजार इतकी असून, गणेशोत्सवाच्या काळात ही संख्या ५ लाखांच्या पुढे जाण्याचा अंदाज आहे. यामुळे पुणे शहराच्या मध्यवस्तीत लक्षणीय गर्दी होण्याची शक्यता आहे.

गणेश दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी आणि दैनंदिन प्रवाशांना होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेऊन, पुणे मेट्रोने खालील सूचना दिल्या आहेत:

पिंपरी चिंचवड मनपा स्थानक ते स्वारगेट स्थानक (मार्गिका १) या मार्गावरून येणाऱ्या भाविकांनी गणेश दर्शनासाठी कसबा पेठ या स्थानकाचा वापर करावा आणि येथून पायी प्रवास करून जवळच्या गणपतींचे दर्शन घेण्याचा आनंद घ्यावा.

वनाझ स्थानक ते रामवाडी स्थानक या मार्गावरून येणाऱ्या भाविकांनी दर्शनासाठी पुणे महानगरपालिका स्थानक, छत्रपती संभाजी उद्यान स्थानक किंवा डेक्कन जिमखाना स्थानक येथे उतरून पुढे गणेश दर्शनासाठी चालत जावे.

पुणे मेट्रोकडून मध्यवस्तीत असणाऱ्या मंडई मेट्रो स्थानकात गर्दी होण्याची शक्यता असल्याने या स्थानकात उतरणे टाळावे, असे विशेष आवाहन करण्यात येत आहे. यामुळे स्थानकांवरील गर्दीचे नियोजन करणे शक्य होईल आणि प्रवाशांना अधिक चांगल्या सेवा पुरवता येतील. तसेच तिकीट खिडकीवरील गर्दी टाळण्यासाठी डिजिटल तिकीट, व्हाट्स अँप तिकीट किंवा पुणे मेट्रोच्या एक पुणे कार्ड च्या वापरावर भर द्यावा.

वृद्ध, महिला आणि गरजू व्यक्तींना लिफ्ट वापरासाठी प्राधान्य द्यावे. एस्केलेटर किना जिन्याचा जास्तीत जास्त वापर करावा. स्थानकांच्या प्रवेश द्वारापाशी आणि बाहेर पडताना रांगेने आत किंवा बाहेर जावे. त्या भागात गर्दी करणे टाळावे.

# थोर समाजसुधारक श्री चक्रधरस्वामी यांच्या जयंती निमित्त अभिवादन

**पिंपरी । प्रतिनिधी**


थोर समाजसुधारक श्री चक्रधरस्वामी यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे अभिवादन करण्यात आले. महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील श्री चक्रधरस्वामी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी मुख्य उद्यान अधिक्षक महेश गारगोटे, उप आयुक्त सीताराम बहुरे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच महानगरपालिकेच्या विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

श्री चक्रधरस्वामींनी आपल्या संत जीवनातून साधेपणा, अध्यात्म, भक्ती, समाजातील समता व मानवतेचा संदेश दिला. त्यांनी प्रतिपादन केलेले विचार आजही तितकेच मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरतात.

# जोगेश्वरी कुंडात शिक्षक, विद्यार्थ्याचा जीव गेला

**संभाजीनगर । प्रतिनिधी**



वेरूळ लेणीतील जोगेश्वरी कुंडाच्या पाण्यात एक विद्यार्थी घसरला आणि त्याला वाचवण्याच्या प्रयत्नात त्याचा शिक्षकही बुडाला तेव्हा पिकनिकला दुःखद वळण लागले. चेतन संजय पगडे (१७, रा. इटखेडा) आणि राजवर्धन अशोक वानखेडे (३०) अशी मृतांची नावे आहेत. ही घटना रविवारी दुपारी घडली.

बुलढाणा जिल्ह्यातील किनोला तालुक्यातील रहिवासी आणि सध्या इटखेडा येथे राहणारे वानखेडे एका खाजगी शिकवणी वर्गात शिक्षक म्हणून काम करत होते.

रविवारी, तो आणि त्याचे नऊ विद्यार्थी वेरूळ लेण्यांमध्ये पिकनिकसाठी गेले होते. ते जोगेश्वरी कुंड परिसरात गेले होते आणि चेतन पाण्यात घसरला. दुसरा विचार न करता, वानखेडे यांनी त्यांना वाचवण्याच्या प्रयत्नात पाण्यात उडी मारली.

तथापि, चेतन घाबरला आणि त्यांनी वानखेडे यांना घट्ट धरले आणि दोघेही बुडाले. इतर शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी मदतीसाठी आरडाओरडा केला. गुहांचे सुरक्षा रक्षक आणि काही स्थानिक मेंढपाळ घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी दोघांनाही पाण्यातून बाहेर काढले. त्यांना ताबडतोब वेरूळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले, जिथे तपासणीनंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

# व्यसनाधीन व्यक्तींवर संस्थांतर्गत उपचार मात्र वस्तीपातळीवर केवळ जनजागृती

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरात वस्तीपातळीवर व्यसनमुक्तीचे प्रयोग काही अपवादात्मक झाले आहेत. एखाद्या व्यक्तीचे वैयक्तिक व्यसन सोडायला लावण्याची प्रक्रिया संस्थेमध्ये निवासी ठेऊनच होण्याची शक्यता अधिक असते. अशा व्यसनमुक्तीचे कार्य करणाऱ्या मोजक्याच संस्था शहरात आहेत.

गावातील दारूबंदीचा प्रयोग यशस्वी झाल्याच्या अनेक घटना आहेत. मात्र, शहरातील एखादी वस्ती, नगरात दारूबंदीचा प्रयोग झाल्याचे ऐकिवात नसल्याचे मतही काही संस्थांमध्ये काम करणाऱ्या समाजसेवक व समुपदेशकांनी व्यक्त केले. तरी सुद्धा काही संस्था वस्तीपातळीवर व्यसनमुक्तीचा प्रयोग करण्याचा प्रयत्न करीत आहे. पुणे शहरात व्यसनमुक्तीवर काम करणारी मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्र ही राज्यातीलच नव्हे तर देशातील एक शिखर संस्था आहे. ही संस्था गेली तीन दशके व्यसनमुक्तीचे कार्य करते. मुक्तांगण संस्थापातळीवर व्यसनमुक्त होणाऱ्यांना महिनाभर निवासी ठेऊन उपचार करते. यामध्ये प्राणायाम, गटचर्चा, विविध उपक्रम व औषधोपचार व समुपदेशनाच्या माध्यमातून अनेकांना व्यसनमुक्त केले आहे.

मुक्तांगण गेली अनेक वर्ष वस्तीपातळीवर व्यसनमुक्तीसाठी जाणीव जागृतीसाठी पथनाट्य, शालेय मुलांची रॅली, पोस्टर प्रदर्शन, विद्यार्थासाठी निबंधस्पर्धा , सायकल रॅलीचे आयोजन करते. स्त्रीमुक्ती संस्था व मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्र 'जिज्ञासा' प्रकल्प राबविते. या अतर्गत त्यांनी महापालिकेच्या शाळेतील इयत्ता नववीच्या विद्यार्थाना व्यसनमुक्तीचे धडे देते. यामध्ये मुक्तांगण मधील समुपदेशक जे व्यसनमुक्त झाले आहेत ते मुलांना मार्गदर्शन करतात. येरवडा परिसरात गेली दोन दशके ' निर्भय विद्यार्थी अभियान' सुरू आहे. यामध्ये सुद्धा मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्र सहयोगी संस्था आहे. परिमंडळ चार पोलीस उपायुक्त कार्यालय अंतर्गत असलेल्या येरवडा,



खडकी, चतुःश्रृंगी, विश्रांतवाडी, विमाननतळ, चंदननगर, लोणीकंद अशा सात पोलीस ठाण्यात निर्भय अभियानचे काम शालेयस्तरावर सुरू आहे. यामध्ये स्थानिक पोलीस ठाणे , स्वयंसेवी संस्था, शाळा व सामाजिक कार्यकर्त्यांच्या माध्यमातून काम सुरू आहे.

हा प्रकल्प आता 'निर्धार अभियान ' म्हणून पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार संपूर्ण पुणे शहरात राबविणार आहेत. यासाठी शहरातील विविध संस्थांची लवकरच बैठक घेऊन मास्टर ट्रेनर तयार केले जाणार आहेत. त्यासाठी अतिरिक्त पोलीस आयुक्त शैलेष बालवडकर व अतिरिक्त पोलीस आयुक्त पूर्व विभाग मनोज पाटील ' निर्धार अभियान' प्रकल्पाचे नियोजन करीत आहेत. मासुम संस्थेने काही वर्षापूर्वी पुरंदर तालुक्यातील माळशिरस, टेकवडे गावात गावपातळीवर व्यसनमुक्तीचा प्रयोग केला होता. यामध्ये समुपदेशक दर शुक्रवारी आठवडा बाजाराच्या दिवशी गावात जात होते. कारण त्यात दिवशी अनेकजण मद्यापन करीत असत. संस्थेने त्यांचा व्यसनाधिन असलेल्यांचा गट केला होता. त्यांची योगासन, गट चर्चा घडवून आणली जात होती. व्यसनी व्यक्तींची टिंगल टवाळी न करता हा आजार असल्याचे सांगितले जात होते. आधिचा मद्याचा घोट व नंतरचा मद्याचा घोट यामध्ये वेळ वाढविण्यास सांगितले जात होते. तलफ झाल्यानंतर पत्नीला घरकामात मदत करा, इतर छंद जोपासा असे सांगितले जात होते. असाच गावपातळीवरचा प्रयोग शहरी वस्त्यांध्ये करता येऊ शकतो. सरकारला दारू मधून मिळणारा महसुल हा दारूच्या दुष्परिणामामुळे होणारे नुकसानापेक्षा अधिक आहे याचा सरकारने गांभीर्याने विचार केला पाहिजे असे सामाजिक कार्यकर्ते मिलिंद चव्हाण यांनी सांगितले. मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्राचे समुपदेशक दत्ता श्रीखंडे यांनी सांगितले की मुक्तांगण गेली अनेक वर्षे वस्तीपातळीवर व शालेयस्तरावर व्यसनमुक्तीचे कार्य करीत आहे. विद्यार्थ्यांमध्ये व्यसन विरोधी विचार रूजविण्यासाठी स्त्रीमुक्ती संघटनेसोबत गेली दोन दशके ' जिज्ञासा' प्रकल्पात व्यसनमुक्तीचे कार्य करीत आहे. महापालिकेच्या शाळेतील इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांना व्यसनविरोधी विचार शिकवीत आहे. हे कार्य पूर्वी व्यसनाधिन असलेले व आता पूर्णपणे व्यसनमुक्त जीवन जगणारे कार्यकर्ते विद्यार्थ्यांचे समुपदेश करतात. त्याचा विद्यार्थ्यांवर सकारात्मक परिणाम होतो. वस्तीमध्ये पोस्टर प्रदर्शन, पथनाट्य, विद्यार्थ्यांची निबंध स्पर्धा, सायकल रॅली आदी विविध उपक्रम राबवितो. यासह पोलीस, डॉक्टर आणि विशेषत: मुलींसाठी व्यसनमुक्तीचे कार्यक्रम राबवित असल्याचे श्रीखंडे यांनी सांगितले. चौकट बांधकाम मुजरांना व्यसनमुक्तीचे धडे मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्र आणि सारा फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे शहर व पिंपरी-चिंचवड मध्ये परप्रांतीय बांधकाम मजुरांसाठी व्यसनमुक्ती कार्यक्रम राबवित आहे. बांधकाम मजुरांचे मद्यपान, मुलांच्या शाळेचा अभाव, एका ठिकाणी स्थानिक नसल्यामुळे अनेक समस्या निर्माण होतात. त्यामुळे मजुरांसह त्यांच्या मुलांसाठी कार्य मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्राचे समुपदेशक संदीप कार्ले कर करीत आहेत. शहरातील अनेक बांधकामाच्या ठिकाणी जाऊन ते मजुरांना व्यसनमुक्तीसह आरोग्याचे धडे देत आहेत.

## महत्वाचे...

### मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी १५ सप्टेंबरपर्यंत शासकीय वसतिगृहासाठी अर्ज करा

**पुणे । प्रतिनिधी**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत असलेल्या जिल्ह्यातील शासकीय वसतिगृहात व्यावसायिक अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी १५ सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत एकूण २४ मागासवर्गीय मुला-मुलींची शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. त्यामध्ये १४ मुलांची व १० मुलींची वसतिगृहे आहेत. पुणे व पिंपरी चिंचवड शहरामध्ये एकूण १३ शासकीय वसतिगृहे असून त्यापैकी मुलींची ४ व मुलांची ८ वसतिगृहे आहेत. तसेच १२ वसतिगृहे तालुकास्तरावर आहेत. समाज कल्याण आयुक्त यांनी सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरिता व्यावसायिक विभागाचे मुलां-मुलींच्या शासकीय वसतिगृह प्रवेशाचे वेळापत्रक प्रसिद्ध केलेले आहे. शासकीय वसतिगृह प्रवेश हे ऑनलाईन पद्धतीने विद्यार्थ्यांनी अर्ज करावयाचे आहेत. १५ सप्टेंबरपर्यंत अर्ज करावयाची मुदत असून १८ सप्टेंबर २०२५ रोजी प्रवेशाची यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. तरी इच्छुक पात्र लाभार्थ्यांनी शासकीय वसतिगृह प्रवेश योजनेचा लाभ घ्यावा, असेही सहायक आयुक्त समाज कल्याण विशाल लोंढे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

### मागासवर्गीय महामंडळाच्या थकीत कर्ज लाभार्थीसाठी एकरकमी परतावा योजना

**पुणे । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील इतर मागासवर्गीय महामंडळाच्या थकीत कर्ज प्रकरणात लाभार्थीसाठी एकरकमी परतावा योजना राबविण्यात येत असल्याचे जिल्हा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ यांनी कळविले आहे. या योजनेनुसार ओबीसी महामंडळाच्या थकीत कर्ज रक्कमेचा एकरकमी परतावा करणाऱ्या लाभार्थीस थकीत व्याज रकमेत ५० टक्के सवलत देण्याबाबतची एकरकमी भरणा परतावा जढड योजना ३१ मार्च २०२६ पर्यत राबविण्यात येणार आहे. तरी महामंडळाच्या थकबाकीदार लाभार्थीना या योजनेचा फायदा घेऊन कर्ज मुक्त व्हावे, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ यांनी एका प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

### गावठी दारू निर्मितीवर पोलिसांची धडक कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील दासगाव परिसरात पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल २२०० लिटर गुळमिश्रीत कच्चं रसायन नष्ट केलं. हे रसायन गावठी हातभट्टी दारू तयार करण्यासाठी भिजत घालण्यात आलं होतं. याची किंमत सुमारे ७७ हजार रुपये इतकी असल्याचं सांगितलं जात आहे. शनिवारी दुपारी अकरा वाजून सत्तावन्न मिनिटांच्या सुमारास संत तुकाराम साखर कारखान्याजवळील मोकळ्या जागेत ही कारवाई झाली. महिला आरोपी (वय ३०) हीच दारू तयार करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर छापा टाकण्यात आला. मात्र, पोलिसांची चाहूल लागताच आरोपी झुडपांचा आडोसा घेत पसार झाली. ही कारवाई पोलीस पथकाने केली असून, मावळ पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# गणेशोत्सव २०२५ साठी पुणे महापालिकेची व्यापक तयारी



**पुणे । प्रतिनिधी**

सार्वजनिक गणेशोत्सव २०२५ (दि. २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर) शांततेत, सुरक्षिततेत व पर्यावरणपूरक पद्धतीने पार पडावा यासाठी पुणे महानगरपालिका प्रशासनाने सर्व विभागांमार्फत व्यापक तयारी केली आहे.

अग्निशमन विभागाकडून शहरातील १५ प्रमुख विसर्जन घाटांवर २४ तास फायरमन व जीवरक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. नदीपात्रात आडवे दोरखंड, लाईफ जॅकेट्स, ट्रॅफिक व्हेस्टचा वापर करून भाविकांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यात येत आहे. अनंत चतुर्दशीच्या मिरवणुकीसाठी टिळक चौक व नटराज सिनेमा परिसरात मदत केंद्र उभारले जाणार आहेत.







विद्युत विभागाकडून शहरातील सर्व स्ट्रीटलाईट पोल तपासणी करून धोकादायक पोल हटविण्यात आले आहेत. विसर्जन घाटांवर ३,७०८ एलईडी दिवे, १९७ जनरेटर सेट, ३८८ स्पीकर सेट व ३४४ सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जाणार आहेत. नागरिकांनी अनधिकृत वीज जोडणी टाळून अधिकृत जोडणी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. पथ विभागाने 'मिशन ३२' अंतर्गत मध्यवर्ती गावठाणातील प्रमुख रस्त्यांचे रिसरफेसिंग व दुरुस्तीचे काम पूर्ण केले असून विसर्जन मार्गावर पॅचवर्क, डांबरीकरण व खड्डे बुजविण्याची कामे केली आहेत. ''PMC रोड मित्र'' ॲपद्वारे नागरिकांना रस्त्यांच्या तक्रारी नोंदविता येतील. घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून पर्यावरणपूरक विसर्जनासाठी ३८ हौद, ६४८ टाक्या, ३२८ निर्माल्य कलश आणि २४१ मूर्ती संकलन केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. वाघोली खाणीमध्ये पुनर्विसर्जनासाठी जेसीबी, पोकलेन यंत्रणा उपलब्ध करून देण्यात आली आहे. निर्माल्यापासून खत तयार करून शेतकऱ्यांना पुरविण्याचा उपक्रम राबविण्यात येणार आहे, तर शाडूच्या मातीचा पुनर्वापर स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने केला जाईल. दरम्यान, अतिरिक्त महापालिका आयुक्त, उपायुक्त व संबंधित अधिकाऱ्यांनी विविध विसर्जन हौदांची पाहणी करून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत.

# मुंबईतील आंदोलनापूर्वी मनोज जरंगे यांचा शिवनेरी किल्ल्यावर विसावा

**पुणे । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणासाठी लढ्याला वेग मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने आंदोलन सुरू आहे. या चळवळीचे प्रमुख कार्यकर्ते मनोज जरंगे यांनी मुंबईत मोठा निषेध आयोजित करण्याचा निर्णय घेतला असून, गुरुवारी सकाळी ते शेकडो समर्थकांसह पुणे जिल्ह्यातील शिवनेरी किल्ल्याच्या पायथ्याशी पोहोचले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मभूमीवर श्रद्धांजली वाहून त्यांनी आपल्या आंदोलनाला ऐतिहासिक आणि प्रतीकात्मक बळ दिले.



बुधवारी जालना जिल्ह्यातील अंतरवली सराटी गावातून जरंगे पुन्हा उपोषणासाठी निघाले होते. मुंबईपासून सुमारे ४०० किमी अंतर पार करत ते आपल्या हजारो समर्थकांसह राजधानीकडे जात होते. तथापि, प्रवासादरम्यान पुण्याजवळ त्यांनी सरकारी शिष्टमंडळाशी चर्चेला सहमती दर्शवली. जरंगे यांची प्रमुख मागणी म्हणजे मराठा समाजाला इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गात समाविष्ट करून १० टक्के आरक्षण देण्यात यावे.

जरंगे यांनी जालन्यात पत्रकारांना सांगितले की, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी त्यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला आणि सरकारी प्रतिनिधी मंडळ चर्चेसाठी शिवनेरी येथे भेटणार असल्याची माहिती दिली. मात्र, विखे पाटील यांनीच नंतर स्पष्ट केले की, राज्य सरकारने अद्याप या पातळीवर औपचारिक चर्चा करण्याचा निर्णय घेतलेला नाही. यामुळे या भेटीबाबत संभ्रमाची स्थिती निर्माण झाली असली तरी जरंगे यांनी आपल्या समर्थकांना शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करण्याचे आणि चालू गणेशोत्सवात कोणत्याही प्रकारचा व्यत्यय न आणण्याचे आश्वासन दिले आहे.

जरंगे यांची आणखी एक महत्त्वाची मागणी म्हणजे सर्व मराठा समाजाला 'कुणबी' म्हणून मान्यता द्यावी. कृषीप्रधान कुणबी जात आधीच ओबीसी प्रवर्गात समाविष्ट असल्याने या माध्यमातून मराठा समाजालाही शिक्षण व सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षणाचा लाभ मिळू शकेल, असा त्यांचा युक्तिवाद आहे. जालना पोलिसांनी जरंगे आणि त्यांच्या समर्थकांना ४० अटी घालून मोर्चा पुढे नेण्याची परवानगी दिली आहे. यात कायदा-सुव्यवस्था बिघडणार नाही, वाहन वाहतुकीत अडथळा होणार नाही आणि कोणत्याही प्रकारच्या आक्षेपार्ह घोषणा देणार नाहीत, अशा अटींचा समावेश आहे. दुसरीकडे मुंबई पोलिसांनीही आझाद मैदानावर निदर्शनांची परवानगी दिली आहे. २९ ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ या वेळेत शांततापूर्ण निदर्शने करता येणार असून, सायंकाळी सहा वाजल्यानंतर निदर्शकांनी मैदान सोडणे बंधनकारक असेल.

मुंबईत प्रवेश करताना सुरक्षा लक्षात घेऊन काही मर्यादा ठेवल्या आहेत. वाडी बंदर जंक्शनपासून मुख्य निदर्शकांच्या केवळ पाच वाहनांना आझाद मैदानात प्रवेश दिला जाणार आहे. तसेच निदर्शकांची संख्या ५,००० पेक्षा अधिक नसावी, अशी अटही घालण्यात आली आहे. या सर्व नियमांमुळे आंदोलन सुरळीत आणि कायद्याच्या चौकटीत पार पडावे, असा प्रशासनाचा प्रयत्न आहे.

मराठा समाजाचे आरक्षणाचे स्वप्न प्रत्यक्षात येईल का, हा प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे. परंतु, मनोज जरंगे यांच्या नेतृत्वाखालील चळवळीला मिळणारा प्रचंड प्रतिसाद पाहता राज्य सरकारसमोर दबाव निश्चितच वाढत चालला आहे.





## गणेशोत्सवासाठी पुणे पोलिसांची कडेकोट सुरक्षा; अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड

**पुणे । प्रतिनिधी**

गणेशोत्सव हा पुण्याचा आत्मा मानला जातो. लाखो भाविकांची गर्दी, मिरवणुका आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर हा सण शांततेत आणि सुरक्षिततेत पार पडावा यासाठी पुणे पोलिसांनी व्यापक सुरक्षा योजना आखली आहे. गुरुवारी एक्स (पूर्वी ट्विटर) वरून पोलिसांनी याबाबत सविस्तर माहिती जाहीर केली. २७ ऑगस्टपासून ७ सप्टेंबरपर्यंत चालणाऱ्या या उत्सवासाठी तब्बल सात हजारांहून अधिक पोलिस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

यात दहा पोलिस उपायुक्त, २७ सहाय्यक पोलिस आयुक्त, १४७ पोलिस निरीक्षक, ६१८ सहाय्यक निरीक्षक आणि उपनिरीक्षक तसेच ६,२८२ कॉन्स्टेबल यांचा समावेश आहे. याशिवाय, १६ स्ट्राइकिंग युनिट्स, १४ जलद प्रतिसाद पथके, सात बॉम्ब शोध आणि निकामी पथके, १,१०० होमगार्ड्स आणि एक डठझऋ कंपनीही तैनात करण्यात आली आहे. मानवी फौजफाट्याबरोबरच पुणे पोलिसांनी यावेळी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचाही आधार घेतला आहे. गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि सुरक्षेवर बारीक लक्ष ठेवण्यासाठी एआय-आधारित व्हिडिओ ॲनालिटिक्स असलेले सीसीटीव्ही कॅमेरे, आयपी-आधारित सार्वजनिक पत्ता प्रणाली, मोबाइल सर्व्हेलन्स व्हॅन, ड्रोनद्वारे हवाई नजर, जीपीएस ट्रॅकर्स आणि अलर्ट प्रणालीचा वापर केला जात आहे. तसेच, १५० कॅलिब्रेटेड मीटरद्वारे ध्वनी पातळीचे निरीक्षण केले जात असून, अँटी-ड्रोन गन, वायरलेस कम्युनिकेशन सिस्टम, ५० डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर आणि १५० हँड-हेल्ड मेटल डिटेक्टर यांचा वापर तोडफोडविरोधी तपासणीसाठी केला जात आहे. लाऊडस्पीकर वापराबाबतही पोलिसांनी स्पष्ट नियम आखले आहेत. फक्त ३० ऑगस्ट ते ४ सप्टेंबर आणि ६ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ६ ते मध्यरात्री १२ वाजेपर्यंतच लाऊडस्पीकर वापरण्यास परवानगी देण्यात आली आहे.

## गणेशोत्सव काळात पुणे शहरातील मध्यवर्ती भागात जड वाहन वाहतूक बंद आदेश जारी

**पुणे । प्रतिनिधी**

शहरात गणेश उत्सव काळात नागरिकांची साहीत्य खरेदी व देखावे पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी होते. सुरक्षेची उपाययोजना व रस्त्यांवरून धावणाऱ्या जड/अवजड वाहनांमुळे नागरिकांना असुरक्षितता निर्माण होवून त्यांचे जिवीतास धोका होवू नये तसेच शहरातील खालील ठिकाणी वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे राहण्यासाठी अत्यावश्यक सेवेतील वाहने म्हणजेच फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहिका, गणेश देखावे वाहतूक करणारी वाहने वगळून खालीलप्रमाणे आदेश जारी केले आहेत.





२५ ऑगस्ट ते ०७ सप्टेंबर २०२५ पर्यंत पुढील नमुद रस्त्यांवर जड / अवजड वाहनांच्या वाहतूकीस २४ तास बंदी करण्यात आली आहे.

शास्त्री रोड - सेनादत्त चौकी चौक ते अलका चौक, टिळक रोड - जेधे चौक ते अलका चौक, कुमठेकर रोड - शनिपार ते अलका चौक, लक्ष्मी रोड - संत कबीर चौक ते अलका चौक, केळकर रोड - फुटका बुरुज ते अलका चौक, बाजीराव रोड - पुरम चौक ते गाडगीळ पुतळा, शिवाजी रोड - गाडगीळ पुतळा ते जेधे चौक, कर्वे रोड - नळस्टॉप चौक ते खंडोजीबाबा चौक, फर्ग्युसन कॉलेज रोड - खंडोजीबाबा चौक ते विर चाफेकर चौक, जंगली महाराज रोड - स.गो. बर्वे चौक ते खंडोजीबाबा चौक, सिंहगड रोड - राजाराम ब्रिज ते सावरकर चौक, गणेश रोड / मुदलियार रोड – पॉवरहाऊस – दारुवाला - जिजामाता चौक - फुटका बुरुज चौक या प्रमाणे करण्यात आलेल्या वाहतुक बदलांचा अवलंब करून गणेशोत्सव शांततेने पार पाळण्यास व वाहतुक सुरळीत ठेवण्यास पुणे वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे.

## अतिरिक्त आयुक्तांनी विसर्जन घाटांवरील सोयीसुविधांचा घेतला आढावा

**पुणे । प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी महापालिकेच्या ग, ड आणि ह प्रभागातील तर अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी अ, ब प्रभागातील महत्त्वाच्या गणेश विसर्जन घाटांची पाहणी करून आवश्यक सोयीसुविधांचा सखोल आढावा घेतला.

शहरात दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक गणेश विसर्जनासाठी घाटांवर येतात. त्याअंतर्गत विविध घाटांवरील सुविधा, स्वच्छता व सुरक्षा यांचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी अतिरिक्त आयुक्त खोराटे यांनी सुभाषनगर घाट, पवनेश्वर घाट, महादेव मंदिर घाट, दत्त मंदिर घाट, ड प्रभागातील पुनावळे राम मंदिर शेजारील घाट, अशा विविध ठिकाणांना भेट दिली.

> **पिंपरी चिंचवड शहरातील सर्वच विसर्जन घाटांवर अधिक काटेकोर नियोजन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. मूर्ती संकलनाची योग्य व्यवस्था करा. सर्व संबंधित विभागांनी नियोजित कालावधीत आवश्यक उपाययोजना पूर्ण करण्याच्या सूचना आज पाहणी दरम्यान दिल्या आहेत.**
> **– तृप्ती सांडभोर, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**



> **विसर्जन घाटांवरील सर्व सुविधा वेळेत उपलब्ध करून भाविकांना कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देश दिले आहेत. पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी निर्माल्य व प्लास्टिक कचऱ्याची स्वतंत्रपणे विल्हेवाट लावा. कृत्रिम विसर्जन हौदे व नदी घाटांची नियमित स्वच्छता करा, अशा सूचना आज पाहणी दरम्यान दिल्या आहेत.**
> **– विजयकुमार खोराटे,**
> **अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

## गणेश उत्सव व सणासुदीच्या काळात अन्न व औषध प्रशासनामार्फत विशेष तपासणी मोहिम

**पुणे । प्रतिनिधी**

गणेश उत्सव काळात नागरिकांना स्वच्छ, निर्भळ अन्न प्राप्त व्हावे यासाठी अन्न व औषध प्रशासन पुणे मार्फत उत्सव काळात विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे.

जिल्हयात ११ ऑगस्ट २०२५ रोजी पासुन आज पर्यंत एकुण ३५ अन्न आस्थापनेच्या तपासण्या करण्यात आल्या असुन अन्न आस्थापनेतून सणासुदीच्या काळात प्रसादासाठी लागणारे कच्चे अन्न पदार्थ व मिठाई यांचे एकुण ६२ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात असून विश्लेषण अहवाल प्राप्त होताच कायद्याप्रमाणे कारवाई करण्यात येणार असल्याचे सह आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, पुणे यांनी कळविले आहे.

गणेश उत्सव व येणा-या सणासुदीच्या काळात अशी धडक कारवाई चालु राहणार आहे. सदरची कारवाई अन्न व औषध प्रशासन, म. राज्य पुणे कार्यालयातील सर्व अन्न सुरक्षा अधिकारी व सहायक आयुक्त (अन्न) यांचे मार्फत सह आयुक्त (पुणे विभाग) अन्न व औषध प्रशासन, म. राज्य पुणे तसेच आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, म. राज्य मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली पार पडण्यात आली. सणासुदीच्या दरम्यान विक्री करण्यात येणा-या अन्न पदार्थामध्ये भेसळीबाबत काही संशय असल्यास जागरुक नागरिकांनी प्रशासनाचा १८००२२२३६५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा असे, आवाहन सह आयुक्त (अन्न) (पुणे विभाग) अन्न व औषध प्रशासन सुरेश अन्नपुरे यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.

## गणेशोत्सवा दरम्यान ७ दिवस ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धकाचा वापर करण्यास परवानगी

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यशासनाने गणेश उत्सव हा राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्याचे घोषित केले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात सार्वजनिक गणेश मंडळांला ध्वनी प्रदुषण संबंधी नियमांचे पालन करून गणेशोत्सवादरम्यान ७ दिवस सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धकाचा वापर करण्यास परवानगी देण्याबाबतचा आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी निर्गमित केला आहे.



ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक वापराच्या निर्बंधास सूट दिल्याबाबत यापूर्वीच्या ३१ जानेवारी २०२५ रोजीच्या आदेशात बदल करून हे सुधारित आदेश जारी करण्यात आले आहेत. यानुसार गणेशोत्सवासाठी शनिवार ३० ऑगस्ट, रविवार ३१ ऑगस्ट, सोमवार १ सप्टेंबर, मंगळवार २ सप्टेंबर, बुधवार ३ सप्टेंबर, गुरुवार ४ सप्टेंबर, शनिवार ६ सप्टेंबर या एकूण ७ दिवसांच्या कालावधीत सदर निर्बंधांना सूट देण्यात आली आहे. याशिवाय नवरात्री उत्सवासाठी बुधवार १ ऑक्टोबर व गुरुवार २ ऑक्टोबर, ख्रिसमससाठी गुरुवार २५ डिसेंबर आणि वर्षाअखेरसाठी बुधवार ३१ डिसेंबर रोजीही या निर्बंधांना सूट देण्यात आली आहे. तसेच महत्त्वाच्या कार्यक्रमासाठी आवश्यकतेनुसार परवानगी देण्याच्या अनुषंगाने एक दिवस राखीव ठेवण्यात आला आहे.